## धारेश्वर शिक्षण संस्था औरंगाबाद संचलित

# कला व विज्ञान महाविद्यालय चिंचोली (लि.)

## ता. कन्नड जि. औरंगाबाद.

### (नॅक मुल्यांकन 'ब' दर्जा प्राप्त)

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग

### कार्यक्रमाधिकारी

***डॉ. गजानन चिट्टेवाड***

***डॉ. वंदना बंनकर***

# 2018-19

# कला व विज्ञान महाविद्यालय, चिंचोली (लि.) ता. कन्नड
# जि. औरंगाबाद

## राष्ट्रीय सेवा योजनेचा नियमित व विशेष कार्यक्रम अहवाल सन २०१८-१९.

राष्ट्रीय सेवा योजना म्हणजे विद्यार्थ्यांची जडणघडण घडवून त्यांच्या व्यक्तिमत्वाच्या विकासासोबत त्याला एक जबाबदार, सक्षम, श्रजनशील, श्रमसंस्कारी नागरिक निर्माण करण्याची चळवळ आहे. राष्ट्रीय सेवा योजना सामाजिक बांधीलकीची योजना असून यामध्ये राष्ट्रीय एकात्मता, राष्ट्रनिष्ठा, राष्ट्रभक्ती, पर्यावरण, अंधश्रध्दा निर्मूलन, दहशतवादाचे उच्चाटन इत्यादी अनेक राष्ट्रीय प्रश्नांना सोबत घेवून चालणारी राष्ट्रीय युवक आंदोलनाची चळवळ आहे. युवक-युवतींच्या सृजनशिलतेला चालना देऊन त्यांच्या विधायक कार्यातून समाज परिर्वनाकरीता कार्यान्वित करण्याच्या उद्देशाने या महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेत विविध उपक्रम राबविले जातात. जसे सामाजिक ऐक्य पंधरवाडा, स्वास्थ्यासाठी योगा दिन, पर्यावरणाच्या संवर्धनासाठी वृक्षारोपन, स्वंयसेवकांच्या बौध्दीक विकास करण्यासाठी अनेक विविध स्पर्धा रा.से.योच्या माध्यमातून घेतल्या जातात उदा. निबंध स्पर्धा, वकृत्व स्पर्धा, प्रश्नमंजूषा, ग्रामस्वच्छता अभियान, संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान, पर्यावरण संरक्षण राष्ट्रप्रेम आदी शिक्षणाबरोबरच समाज सेवा आणि अशा विविध गुणांचे संस्कार रा.से. योच्या माध्यमातून राबविले जातात.

यामध्ये कार्यक्रमाचे संयोजन सुत्रसंचालन, पाहूण्याचा परिचय, स्वागतगीत, आभार, विषयी मांडणी, वकृत्व तयारी, रॅली, घोषना, घरोघरी भेटी देसून स्वच्छतेचे महत्व पटवून देण्यात आले.त्याशिवाय युवा चर्चा अशा अनेक उपक्रमांमधून युवक व त्यांचे नेतृत्व विकसित केले गेले. यामूळे विद्यार्थामध्ये न्युंनगंडाची जागा त्यांच्यामधील आत्मविश्वासने घेतली यासारख्ये प्रयत्न आमच्या सर्वांसाठी आशादायक होते. कारण आम्ही विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास केंद्रस्थानी ठेवून कार्य केलेले आहे करत आहोत.

स्वयंसेवकांच्या मदतीने व सर्व प्राध्यापकांच्या व कर्मचा-यांच्या सहकार्याने मौजे नेवपूर ता. कन्नड जि. औरंगाबाद येथे दिनांक ५ फेब्रूवारी २०१९ ते ११ फेब्रूवारी २०१९ या कालावधीत सात दिवशीय रा.से.यो. चे विशेष शिबीर यशस्वीपणे घेण्यात आले. महाविद्यलयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागा अतंर्गत नियमित व विशेष कार्यक्रमाचा थोडक्यात अहवाल पुढील प्रमाणे आहे.

**२१ जुन २०१८ आंतरराष्ट्रीय योगा दिन :-** आंतरराष्ट्रीय योग दिना निर्मीताने राष्ट्रीय सेवा योजनेच्या सर्व स्वंयसेवक विद्यार्थी, विद्यार्थीनी व महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचारी यांना योगाचे प्रशिक्षण व प्रत्येक्षिक दाखवून महत्व सांगण्यात आले. पहिल्या सत्रात प्रा. सुनिल काळे आणि डॉ. उमाकांत गायकवाड यांनी योगासनाची प्रात्याक्षिके दाखवली व दुपारच्या सत्रात योगाचे महत्व यावर भाष्य करण्यात आले आहे.

**१. वृक्षारोपण:-** दिनांक ०३/०७/२०१८ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागा अंतर्गत महाविद्यालयाच्या परिसरात वृक्षारोपन करण्यात आले. हे वृक्षारोपन जि.प. सदस्य व प्राचार्य संदिप पाटील तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विक्रमसिंह पवार यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच या प्रसंगी वृक्षारोपनाचे महत्व रा.से.यो कन्नड ता. गट समन्वयक डॉ. उमाकांत गायकवाड यांनी व रा.से.यो कार्यक्रमाधिकारी डॉ. गजानन चिट्टेवाड डॉ. वंदना बनकर यांनी सांगीतले. यावेळी गावातील ग्रामस्थ, महाविद्यालयातील स्टाफ व रा.से.यो स्वंयसेवक मोठया संख्येने उपस्थितीत होते.

**२.स्वच्छता पंधरवाडा :-** दिनांक १२/०८/२०१८ रोजी रा.से.योजने चे विद्यार्थी एकत्र येवून महाविद्यालयातील परिसराची स्वच्छता केली. तसेच आपला देश आणि आपला परिसर स्वच्छ करण्याच्या अभियात म्हणजेच स्वच्छ भारत अभियानात जनतेचा सहभाग वाढवण्याचा मानस व्यक्त करण्यात आला.

**३. स्वांतत्र्य दिन ध्वजारोहन :-** १५ ऑगस्ट २०१८ स्वातंत्र्य दिन कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी सौ. वत्सलाबाई सपकाळ यांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात आले. प्रमूख उपस्थिती मध्ये सेवा निवृत्त शिक्षणाधिकारी डॉ. टी.पी.

पाटील साहेब तसेच गावातील प्रतिष्ठीत नागरीक उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य विक्रमसिंह पवार हे होते. याप्रंसगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

**४. विद्यापीठ वर्धापन दिन :-** दिनांक २३/०८/२०१८ रोजी विद्यापीठ वर्धापन दिनानिमित्त रा.से.यो चे विद्यार्थीनी एकत्र येवून महाविद्यालयातील परिसर स्वच्छता केली. प्राचार्य विक्रमसिंह पवार यांच्या हस्ते विद्यापीठाच्या ध्वजाचे ध्वजारोहन करण्यात आहे. यावेळी विद्यापीठ गीत लावण्यात आले. यानंतर वकृत्व स्पर्धा घेण्यात आली व स्वंयसेवकांना अल्पोहार व चहा देण्यात आला.या प्रसंगी महाविद्यालयातील कर्मचारी उपस्थितीत होते.

**५. शिक्षक दिन :-** दिनांक ०५ सप्टेबंर २०१८ रोजी शिक्षक दिनानिमीत्ताने निंबध स्पर्धा घेण्यात आली. तसेच महाविद्यालयात रा.से.यो. विभागा अंतर्गत शिक्षक दिन साजरा करण्यात आला. या प्रसंगी मार्गदर्शक म्हणून मानसशास्त्र विभागाचे प्रा. रामेश्वर राऊत यांनी स्वंयसेवकांना मार्गदर्शन केले. ज्या देशाची शिक्षण व्यवस्था योग्य पध्दतीने कार्य करते त्या देशाचा युवा सक्षम असतो शिवाय त्या देशाच्या प्रगतीला गती मिळते असे प्रतिपादन प्रा. राऊत यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. विक्रमसिंह पवार होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. अनिता खंडागळे यांनी मानले तर अभार रा.से.यो. कार्यक्रमाधिकारी डॉ. गजानन चिट्टेवाड यांनी मानले. या प्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

**६. केरळ पुरग्रस्तासाठी मदत निधी रॉली :** केरळ पुरग्रस्तासाठी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाव्दारे मदत फेरी काडण्यात आली. या मदत फेरीमध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. विक्रमसिंह पवार रा.से.यो. कार्यक्रमाधिकारी डॉ. गजानन चिट्टेवाड डॉ. अनिता खंडागळे, डॉ. उमाकांत गायकवाड डॉ. पुरुषोत्तम मनगटे प्रा. प्रतिभा आघार्डे, प्रा. वंदना पाटील डॉ. योगेश भाले डॉ. संजय मगर डॉ. सजय वाकळे प्रा. रामेश्वर राऊत यांनी मदत देवून फेरीची सुरुवात केली व चिंचोली परिसरात व आवढवडी बाजारामध्ये फिरुण या मदत फेरीतून रुपय रक्कम १०५०/- इतका निधी संकलीत करुन तो. आपत्कालीन मुख्यमत्री मदत केंद्र केरळ येथे CMDR FUND मध्ये पाठवण्यात आला. या फेरीमध्ये महाविद्यालयातील माझे सहकारी यांनी मोलाचे सहकार्य केले तसेच विद्यार्थांनी मोठया प्रमाणात उपस्थितीत राहून पुरग्रस्तांसाठी निधी संकलना बाबत परिश्रम घेतले.

**७.राष्ट्रीय सेवा योजना वर्धापन दिनः-**दिनांक २४ सप्टेंबर २०१८ रोजी रा.से.योजना विभाग व्दारे राष्ट्रीय सेवा योजना वर्धापन दिनानिमीत्ताने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी स्वच्छता हीच जन सेवा हया हेतूने चिंचोली लिंबाजी येथील कुटूंबाना देऊन त्यांना स्वच्छतेचे महत्व पटवून दिले. व दुपारच्या सत्रामध्ये इंद्राराज महाविद्यालयातील रा.से.यो सिल्लोड तालूका गट समन्वयक डॉ. संतोष चौथाईवाले यांना आंमत्रीत करण्यात आले. त्यांनी रा.से.यो.च्या विद्यार्थांनी कायम तत्पर राहावे व समाजासाठी काही तरी विधायक कार्य करावे या उद्देशाने राष्ट्रीय सेवा योजना विभागाची स्थापना झाल्याचे सांगितले व मुलांना सामाजिक कार्याचे महत्व पटवून दिले. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मा. डॉ. टी.पी. पाटील, सेवा निवृत्त शिक्षणाधिकारी हे होते. तर व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. विक्रमसिंह पवार होते. कार्यक्रमाचे प्रस्तावीक कार्यक्रमाधिकारी डॉ. गजानन चिट्टेवाड यांनी केले तर सुत्रसंचालन प्रा. प्रतिभा आघार्डे यांनी केले तर आभार डॉ. वंदना बनकर यांनी मानले. सदर कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सहकार्य केले त्याच प्रमाणे स्वंयसेवक मोठया प्रमाणात उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली. तद्नंतर अल्पउपोहार स्वंयसेवकांना देण्यात आला.

**८.महात्मा गांधी जयंती :-**राष्ट्रीय सेवा योजना विभागा तर्फे दिनांक ०२ ऑक्टोबर २०१८ रोजी महात्मा गांधी जयती राजरी करण्यात आली. याप्रसंगी मार्गदर्शक म्हणून डॉ. संजय मगर हे होते. डॉ. मगर यांनी महात्मा गांधीचे जीवन चरित्र आणि कार्य यावर प्रकाश टाकला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. विक्रमसिंह पवार होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक रा.से.यो. कार्यक्रमाधिकारी डॉ. गजानन चिट्टेवाड यांनी केले तर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. वंदना

बनकर यांनी केले तर अभार प्रा. प्रतिभा आघार्डे यांनी मांनले. याशिवाय महात्मा गांधीजीची ही १५० वी जंयती असल्याने रा.से.यो विभागाच्या अंतर्गत अनेक कार्यक्रम राबवण्यात आले. त्यामध्ये महात्मा गांधीजीच्या जीवन व कार्यावर निंबध स्पर्धा घेण्यात आली. तसेच महाविद्यालयाचा परिसर स्वच्छता करण्यात आली. त्याच बरोबर रक्त तपासणी शिबीर प्रथामिक आरोग्य केंद्र चिंचोली लिंबाजी व रा.से.यो विभागाच्या संयुक्त विद्यामाने,छत्रपती विद्यालयाच्या मुलांसाठी राबवण्यात आले. सदर उपक्रमासाठी रा.से.यो. चे स्वंयसेवक उपस्थित होते.

**९.संविधान गौरव दिन व संविधान सप्ताह निमित्त कार्यक्रम :-** दिनांक २६/११/२०१८ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे महाविद्यालयात संविधान गैरव दिन साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यलयाचे प्राचार्य डॉ. विक्रमसिंह पवार होते. या प्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन करुन भारतीय संविधावर भाष्य करण्यात आले. तसेच संविधानाच उद्देश पत्रिकेचे सामूहिक वाचन करण्यात केले गेले. तसेच २६/११ रोजी जो हल्ला झाला त्यात शहीद झालेल्यांना श्रध्दांजली वाहण्यात आली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. वंदना बनकर यांनी केले तर आभार रा.से.यो कार्यक्रमाधिकारी डॉ. गजानन चिट्टेवाड यांनी मानले. या प्रसंगी महाविद्यालयातील सर्व स्टाफ आणि रा.से.यो.स्वंयसेवक उपस्थित होते. त्या शिवाय संविधान सप्ताह निमित्ताने रा.से.यो. विभाग व लोकप्रशासन विभाग यांच्या संयुक्त विद्यामाने दिनांक ११-२०१८ रोजी व्याख्यानाचे आयोजन करुन सदर कार्यक्रमासाठी मार्गदशक म्हणून ग्रंथपाल डॉ. योगेश भाले यांना बोलावण्यात आले.

**१०.डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन :** राष्ट्रीय सेवा योजना विभागा तर्फे दिनांक ०६ डिंसेबर २०१८ रोजी महापरिनिर्वान दिन साजरा करण्यात आला. या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून धारेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व सेवा निवृत्त शिक्षणाधिकारी हे होते. तर प्रमूख पाहूणे व मार्गदर्शक म्हणून लोकप्रशासन विभाग प्रमूख व रा.से.यो.कार्यक्रमाधिकारी डॉ. गजानन चिट्टेवाड होते. व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विक्रमसिंह पवार होते. सदर कार्यक्रमाचे संचालन डॉ. संजय मगर यांनी केले तर कार्यक्रमाचे अभार डॉ. योगेश भाले यांनी मानले.

**११.स्वामी विवेकानंद व जिजाऊ जयंती :-** राष्ट्रीय सेवा योजना विभागा मार्फत युवा दिन साजरा करण्यात आल. प्रा. रामेश्वर राऊत यांनी राजमाता जिजाऊ यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला. तर प्राचार्य विक्रमसिंह पावर यांनी स्वामी विवेकानद यांच्या कार्यावर मार्गदर्शन केले. सरद कार्यक्रमाच्या प्रसंगी स्वंयसेवक मोठया संख्ये उपस्थिती होते.

**१२. विद्यापीठ नामाविस्तार दिन :-** १४ जानेवारी रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा नाम विस्तार दिन साजरा करण्यात आला. या प्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विक्रमसिंह पावर यांच्या हस्ते करण्यात आले. डॉ. संजय वाकळे इतिहास विभाग प्रमूख यांनी नामविस्तार दिनाचा इतिहास सांगितला डॉ. उमाकांत गायकवाड यांनी प्रस्ताविक व सुत्र संचालन केले व डॉ. वंदना बनकर यांनी अभार मानले.

**१४. छत्रपती शिवाजी महाराज जयंती :-**दिनांक १९ फेब्रूवारी रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे छत्रपती शिवाजी महाराज जंयती उत्साहात साजरी करण्यात आली. यांप्रसगी प्राचार्य डॉ. विक्रमसिंह पवार यांनी महाराजाच्या प्रतिमेचे पूजन केले. व प्रा. सुनिल काळे यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला. तर अभार डॉ. अनिता खंडागळे मॅडम यांनी मानले. सदर कार्यक्रमाला महाविद्यालयातील स्टाफसह रा.से.यो स्वंयसेवक मोठया प्रमाणात उपस्थितीत होते. कार्यक्रमाचा शेवट राष्ट्रगीत यांनी करुन स्वंयसेवक यांना अल्पोहार व चहा देऊन करण्यात आला.

********************

**आंतरराष्ट्रीय योगा दिनानिमित्त योगासने करतांना महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व कर्ममारी**





महाविद्यालयाच्या परिसरात वृक्षारोपन करतांना जि.प.सदस्य व प्रायार्च संदिप पाटील, प्राचार्य डॉ. विक्रमसिंह पावर तसेच रा.से.यो.चे स्वंयसेवक आणि महाविद्यालयातील स्पफ सह उपस्थित ग्रामस्थ





केरळ येथील पुरग्रस्तासाठी मदत देतांना प्राचार्य डॉ.विक्रमसिंह पावार, रा.से.यो.कार्यक्रमाधिकारी डॉ.गजानन चिट्टेवाड, डॉ. अनिता खंडागळे, डॉ.पुरुषोत्तम मनगटे डॉ.संजय मगर, डॉ. उमाकांत गायकवाड प्रा. प्रतिभा आघार्डे प्रा. वंदना पाटील डॉ. संजय वाकळे प्रा. रामेश्वर राऊत




केरळ पुरग्रस्तासाठी निधी संकलन करतांना



केरळ पुरग्रस्तांसाठीचा संकलीत मदत निधी प्राचार्य डॉ. विक्रमसिंह पावार यांचेकडे सुपूर्त करतांना रा.से.यो. कार्यक्रमाधिकारी डॉ. गजानन चिट्टेवाड डॉ. उमाकांत गायकवाड व उपस्थित सहकारी व विद्यार्थी.






राष्ट्रीय सेवा योजना वर्धापन दिन निमित्त कार्यक्रमाचे संचालन करतांना रा.से.यो. कार्यक्रामाधिकारी डॉ. गजानन चिट्टेवाड या प्रसंगी व्यासपीठावर उपस्थितीत रा.से.यो. सिल्लोड तालूका गट समन्वयक डॉ. एस.एस. चौथाईवाले, इंद्राराज महाविद्यालय सिल्लोड, प्राचार्य डॉ. विक्रमसिंह पवार डॉ. उमाकांत गायकवाड डॉ. वंदना बनंकर




रा.से.योच्या स्वंयसेवकांना मार्गदर्शन करतांना रा.से.यो सिल्लोड तालूका गट समन्वयक डॉ. एस.एस. चौथाईवाले, इंद्राराज महाविद्यालय सिल्लोड

रा.सं.यांजानंचा वर्धापन दिनानिमित्ताने चिंचोली लिं येथील कुटूंबांना भेटी देवून स्वच्छतेचे महत्व सांगण्यासाठीची रॉली.



रा.से.यो स्वंयसेवकासह चिंचोली लिंबाजी येथील कुंटूंबांना भेट देवून स्वच्छतेचे महत्व सांगतांना डॉ. पुरुषोत्तम मनगटे डॉ. वंदना बनकर डॉ. संजय मगर डॉ. उमाकांत गायकवाड डॉ. यशवंत गाढे व उपस्थित ग्रामस्थ आणि स्वंयसेवक.






विद्यार्थांची रक्त तापासणी करतांना चिंचोली लि. येथील प्राथमिक आरांग्य केंद्रातील अधिकारी, कर्मचारी व उपस्थिती कॉलेज स्टाफ

**दिनांक ०६ डिसेंबर रोजी महापरिनिर्वाण दिनामिमित्ताने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करुन त्यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकतांना रा.से.यो. कार्यक्रमाधिकारी डॉ. गजानन चिट्टेवाड या प्रसंगी व्यासपीठावर उपस्थित कार्यक्रमाचे अध्यक्ष धारेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. टी.पी. पाटील, प्राचार्य डॉ. विक्रमसिंह पवार डॉ. संजय मगर आदी.**




**महापरिनिर्वाण दिनामिमित्ताने कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करतांना डॉ. टी.पी. पाटील.**



**दिनांक ०५/०२/२०१९ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबीर मौजे नेवपूर उद्घाटन समारंभ या प्रसंगी कार्यक्रमाचे उद्घाटक डॉ. टी.पी.पाटील, प्रमूख मार्गदर्शक डॉ. दिलीप खैरनार व प्राचार्य डॉ. विक्रमसिंह पवार, नेवपूर येथील प्रथम नागरिक संरपच रा.से.यो. कार्यक्रमाधिकारी डॉ. गजानन चिट्टेवाड आणि ग्रामस्थ**




दि.६/२/१९ रा.से.यो. विशेष शिबीरात मौजे नेवूपर गावातील स्वच्छता करतांना रा.से.यो. स्वंयसेवक व प्राध्यापक









दि.६-२-१९ रा.से.यो. विशेष शिबीरात मौजे नेवूपर गावातील स्वच्छता करतांना रा.से.यो. स्वंयसेवक व प्राध्यापक

**रा.से.यो विशेष शिबीरात माती बंधाराचे काम प्रगती पथावर असलेले काम करतांना डॉ पुरुषोत्तम मनगटे डॉ. संजय वाकळे डॉ. गजानन चिट्टेवाड डॉ. वंदना बनकर प्रा. सुनिल काळे व स्वंयसेवक आणि स्वंयसेवीका.**



**रा.से.यो विशेष शिबीरात माती बंधारा- श्रमदान करतांना मौजे नेवपूर येथील संरपच पत्ती श्री ज्ञानेश्वर देशमूख व ग्रामस्थ या प्रसंगी डॉ पुरुषोत्तम मनगटे डॉ. उमाकांत गायकवाड डॉ. गजानन चिट्टेवाड डॉ. वंदना बनकर व स्वंयसेवक, स्वंयसेविका.**



दिनांक १०/०२/२०१९ रोजी रा.से.यो. विशेष शिबीरात रक्तदान करणा-या स्वंयसेवक दत्तू मुरमूडे यांना डॉ. टी. आर. पाटील, रा.से.यो. संचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ हे पुष्पगुच्छ देतांना या प्रसंगी प्राचार्य डॉ. विक्रमसिंह पवार, रा.से.यो. कार्यक्रमाधिकारी डॉ. गजानन चिट्टेवाड, डॉ.पुरुषोत्तम मनगटे, डॉ. वंदना बनकर, डॉ. संजय वाकळे, लोकमान्य ब्लड बॉकेचे विजय सोनवणे व स्वंयसेवक आदी.



दिनांक १०/०२/२०१९ रोजी रा.से.यो. विशेष शिबीरास भेट देवून श्रमदानातून निर्माण केलेला माती बंधा-याची पाहणी करतांना डॉ. टी. आर. पाटील, रा.से.यो. संचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद. या प्रसंगी प्राचार्य डॉ. विक्रमसिंह पवार, रा.से.यो. कार्यक्रमाधिकारी डॉ. गजाननचिट्टेवाड, डॉ.पुरुषोत्तम मनगटे, डॉ. वंदना बनकर, डॉ. संजय वाकळे व स्वंयसेवक, स्वंयसेविका.




डॉ. टी. आर. पाटील, रा.से.यो. संचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद. हे योजनाचा खजिना “कॉलेज-नॉलेज आणि व्हीलेज” लेखक/ संपादक पुरुषोत्तम भापकर (भा.प्र.से.) हे पुस्तक रा.से.यो. कार्यक्रमाधिकारी डॉ. गजानन चिट्टेवाड, डॉ. वंदना बनकर व प्राचार्य यांना सुपूर्त करतांना.